Pursuant to the direction of the Hon'ble Commission, the 2nd Opposite Party is hereby called upon to appear before the Commission on **14.10.2026**, either in person or through an authorised representative/counsel, and contest the complaint. Failing such appearance, the matter may be proceeded with and decided in accordance with law.

Issued by:
Mr. Usman Khan.K, Complainant
Through Counsel:
M/s. K.S. Punithan, L. Gnanavel & M. Mohamed Shahith Akheel, Advocates
No.28, Purananooru Street, Anna Nagar, Hasthinapuram, Chitlapakkam, Chennai – 600064.

जाहीर नोटीस

सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, **श्री अरविंद दलीचंद संघवी व श्री विजय दलीचंद संघवी** यांनी **फ्लॅट क्र. १४०१, चौदावा मजला, 'ए' विंग,** चटई क्षेत्र ६६.७२ चौ. मी., **"शांती कमल कॉ-ऑप हाऊसिंग सोसा. लिमिटेड"** या सोसायटी मध्ये स्थित जी सिटी सर्वे क्र. ७९९ (पार्ट) व ७८१ (पार्ट) यावर बांधलेली असून, **गाव माझगाव, तालुका व जिल्हा मुंबई** सबअर्बन येथे स्थित असून ते नोंदणीकृत विक्री करारनाम्याद्वारे दिनांक ३०/१२/२००७ त्याची नोंदणी दिनांक १५/०१/२००८ रोजी दस्तऐवज क्र. बीबीई-२/३८६/२००८ अंतर्गत खरेदी केली असून सदर सह-मालक **श्री विजय दलीचंद संघवी** यांचे दिनांक ०८/१२/२०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्याचे सदर फ्लॅट मधील अविभाजित हिस्सा ३४.९१% चे कायदेशीर वारस आहेत १. श्रीमती सोवन विजय संघवी (मृत व्यक्तीची पत्नी) आणि २. कु. पलक विजयकुमार संघवी (मृत व्यक्तीची मुलगी). सदर सह वारस कु. पलक विजयकुमार संघवी ने तिच्या हिस्स्यात येणारे १७.४५५ % मालकी हक्क हे हक्क सोड पत्र दि. ०२/०२/२०२६ दस्तऐवज क्र. बीबीई-४/२३६५/ २०२६ ने सह वारस श्रीमती सोवन विजय संघवी यांच्या पक्षात सोडून दिलेला आहे. त्यामुळे, यापुढे श्री अरविंद दलीचंद संघवी (६५.०९ %) व सौ. सोवन विजय संघवी (३४.९१%) हे सदर मालमत्तेचे संयुक्त मालक (Joint Owners) आहेत.

तथापि, सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, वरील नमूद मालमत्तेच्या बाबतीत कोणासही काहीही प्रतिकूल हक्क, दावे अथवा स्वत्व असल्यास, त्यांनी सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत लेखी पुराव्यांसह सदर पत्त्यावर संपर्क साधावा **नईमा ना. शेख ऑफिस क्र. ४४, पहिला मजला, यशवंत प्लाझा, नवापूर नाका, बोइसर (प.), ता. आणि जिल्हा पालघर – ४०१५०१.** कृपया नोंद घ्या की, लेखी पुरावा न प्राप्त झालेल्या दाव्यांवर विचार केला जाणार नाही.

सही/-
वकील नईमा नादीर शेख
ठिकाण : बोईसर ता. ०८.१०.२०२६

जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री. प्रेमराजन जी. चावरट्टील यांच्या सूचनेनुसार आणि त्यांच्या वतीने, सर्वसामान्य जनतेला याद्वारे नोटीस देण्यात येते की, मेसर्स तानिया बिल्डर्स अँड डेव्हलपर्स आणि (१) श्री. युवराज बापू धुरी व (२) श्री. प्रवीण बापू धुरी यांच्यामध्ये स्वाक्षरी झालेला आणि दुय्यम निबंधक कार्यालय, वसई-२ येथे दिनांक २१.०९.२००० रोजी, पुस्तक क्र. १ मध्ये, अनुक्रमांक P2595/2000 अन्वये नोंदणीकृत असलेला दिनांक २६.०५.२००० रोजीचा मूळ विक्री करार, तसेच 'शिव सह्याद्री को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'चे शेअर्स प्रमाणपत्र क्र. १६, माझ्या पक्षकाराकडून गहाळ झाले आहेत.सदर मूळ विक्री करार आणि शेअर्स प्रमाणपत्र हे दिनांक ०४.१०.२०२६ रोजी, माझे पक्षकार नालासोपारा रेल्वे स्टेशन आणि आचोले रोड दरम्यान प्रवास करत असताना हरवले आहेत. या कागदपत्रांच्या संदर्भात माझ्या पक्षकाराने दिनांक ०५.१०.२०२६ रोजी आचोले पोलीस स्टेशनमध्ये २८५१५/२०२६ क्रमांकाची हरवलेल्या कागदपत्रांची तक्रार नोंदवली आहे.कोणतीही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था, प्राधिकारी किंवा सर्वसामान्य जनतेमधील कोणतीही व्यक्ती, ज्यांना वरील मूळ विक्री करार आणि/किंवा शेअर्स प्रमाणपत्र सापडले असेल, किंवा ज्यांचा सदर विक्री करारात समाविष्ट असलेल्या मालमत्तेवर अथवा वरील कागदपत्रांच्या आधारे कोणताही हक्क, दावा, शीर्षक, हितसंबंध, लियन, चार्ज, तारण किंवा हरकत असेल, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **३० (तीस) दिवसांच्या** आत पुरेशा पुराव्यासह खालील स्वाक्षरीकर्त्याला लेखी स्वरूपात कळवावे.नियत मुदतीत मूळ कागदपत्रांच्या संदर्भात असा कोणताही दावा, हरकत किंवा माहिती प्राप्त न झाल्यास, माझे पक्षकार हे सदर मूळ कागदपत्रे सापडलेली नाहीत आणि या जाहीर नोटीशीच्या अनुषंगाने कोणतीही हरकत किंवा दावा त्यांच्या निदर्शनास आणला गेलेला नाही, या गृहीतकावर पुढील कार्यवाही करतील. त्यानंतर माझे पक्षकार, ज्या व्यक्ती निर्धारित मुदतीत खालील स्वाक्षरीकर्त्याला कळवण्यात अपयशी ठरल्या आहेत त्यांचा पुन्हा संदर्भ न घेता, लागू कायद्यानुसार नोंदणीकृत विक्री कराराची प्रमाणित प्रत मिळवणे आणि/किंवा कागदपत्रांच्या संदर्भात योग्य ती पावले उचलणे यांसारख्या कायदेशीर आवश्यक त्या पुढील गोष्टी पार पाडतील.ज्या कोणालाही वरील मूळ विक्री करार आणि/किंवा शेअर्स प्रमाणपत्र सापडले असल्यास, त्यांनी ते ताबडतोब खालील स्वाक्षरीकर्त्याकडे सुपूर्द करावे, ही विनंती.

दिनांक: ०८/१०/२०२६
स्थळ: नालासोपारा

आशिष कुमार सिंह
(ॲडव्होकेट)
(बार नोंदणी क्र. MAH/1068/2013)
ऑफिस नं. ६, ग्राउंड फ्लोअर, सनशाईन कमर्शियल कॉम्प्लेक्स,स्टेशन रोड, नालासोपारा पूर्व, पालघर - ४०१२०९
मोबाईल क्र.: ७७७५९९१२८७
ईमेल: adv.aksingh80@gmail.com

रोज वाचा
दै. 'मुंबई लक्षदीप'

जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, "द वसई तालुका इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लि., गौराईपाडा, वसई (पूर्व) - ४०१ २०८" चे शेअर्स प्रमाणपत्र क्र. १११८, ज्याचे विशिष्ट क्रमांक २२४३ ते २२४६ आहेत, जे मूळचे मेसर्स सोनाली केमिकल्स प्रा. लि. यांच्या नावे जारी केले गेले होते, त्यानंतर मेसर्स जयश्री पॉवर व्होल्ट प्रा. लि. यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आले, आणि तद्नंतर मेसर्स आशाना एन्टरप्राइज यांच्या नावे हस्तांतरित करण्यात आले होते, ते गहाळ झाले आहेत / हरवले आहेत किंवा सापडत नाहीत; कारण त्यांनी सोसायटीकडे दुबार शेअर्स प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी अर्ज केला आहे.आणि दुबार शेअर्स प्रमाणपत्रे जारी करण्यापूर्वी, सोसायटीच्या वरील पत्त्यावर, दुबार शेअर्स प्रमाणपत्र जारी करण्याबाबत सार्वजनिक सदस्यांकडून किंवा इतर दावेदार अथवा हरकतदारांकडून, त्यांच्या दावे/हरकतींच्या समर्थनासाठी कागदपत्रांच्या प्रती व इतर पुराव्यांसह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दावे/हरकती मागवणे आवश्यक आहे. वरील निर्धारित मुदतीत कोणतेही दावे/हरकती प्राप्त न झाल्यास, सोसायटीतर्फे दुबार शेअर्स प्रमाणपत्र जारी केले जाईल.

स्थळ: वसई
दिनांक: ०८.१०.२०२६

द वसई तालुका इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट लि.
स्वाक्षरी/-
चेअरमन

जाहीर सुचना

माझी अशिल **श्रीमती जयश्रीबेन गुणवंतराय अजमेरा** हे **कै. गुणवंतराय शांतीलाल अजमेरा** यांचे कायदेशीर वारसापैकी एक आहेत. **कै. गुणवंतराय शांतीलाल अजमेरा या फ्लॅट नं. १२०४, १२वा मजला, स्काय हाय टॉवर को. ऑप. हौ. सोसायटी लि., प्लॉट नं. २, ऑफ. शंकर लेन, ऑरलेम टँक रोड,मालाड (प), मुंबई ४०००६४** चे संयुक्त मालक होते. माझी अशिल **श्रीमती जयश्रीबेन गुणवंतराय अजमेरा यांचे पती कै. गुणवंतराय शांतीलाल अजमेरा** यांचे **दिनांक २५.१२.२०१३** रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले आहे. माझे अशिलाचे सांगणेवरुन व मला कळविल्याप्रमाणे माझे आशिल (१) **श्रीमती जयश्रीबेन गुणवंतराय अजमेरा** (पत्नी) आणि (२) **श्री. धर्मेश गुणवंतराय अजमेरा** (मुलगा), आणि (३) **सौ. कश्मीरा आनंद शाह** (विवाहीत मुलगी), हे **कै. गुणवंतराय शांतीलाल अजमेरा** यांचे कायदेशीर वारस आहेत.

या कायदेशीर वारसांव्यतिरिक्त,उपरोक्त फ्लॅट वरील हक्क, शीर्षक, हिस्सा आणि/किंवा स्वारस्यावर कोणताही दावा असल्यास त्याने/तिने ही नोटीस जारी केल्यापासून **७ दिवसांच्या** आत माझ्याशी संपर्क साधावा. विहित मुदतीत उपरोक्त फ्लॅट मधील मृत व्यक्तीच्या हिश्याबाबत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत तर वरील व्यक्तींशिवाय **कै. गुणवंतराय शांतीलाल अजमेरा** यांचे अन्य कायदेशीर वारस नाहीत असे मानले जाईल.

Sd/-
Date: 08/10/2026 Adv. Shital Kadam - Chavan
A2/301, Chavandai Tower CHS, 90 Feet Road, Opp. Raj Park,Parsik Nagar,Kalwa (W) - 400605

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, माझे अशील श्री. अश्विनी कुमार मिश्रा व सौ. कांचन अश्विनी मिश्रा यांनी फ्लॅट क्र. ००३, इमारत क्र. बी–७, चंद्रेश हिल्स बी– ७, ८ सी. एच. एस. लि., सर्व्हे क्र. १९१ (नवीन), जुना सर्व्हे क्र. १४१ हिस्सा क्र. १२, मौजे आचोळे, नालासोपारा (पूर्व), वसई, जिल्हा पालघर येथील सदर फ्लॅट (यापुढे ''सदर फ्लॅट'' असा उल्लेख करण्यात येईल) हा सौ. नीता मुकेश पटेल, यांच्याकडून ''विक्रेता '' म्हणून खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तसेच, नमूद केलेला सदर मालमत्ता पिरामल फायनान्स लिमिटेड कडे गहाण ठेवण्याचा त्यांचा पुढील हेतू आहे.

ज्याअर्थी, श्री. रुथ विवेक वॉकर यांनी सदर फ्लॅट मे. लोढा बिल्डर्स प्रा. लि. यांच्याकडून दिनांक ०९/०५/१९९४ [दस्तऐवज क्र VSI– 1 /Ch–2545 / 1994] रोजीच्या विक्री करारनाम्याद्वारे (Agreement for Sale) खरेदी केला. आणि ज्याअर्थी, श्री. रुथ विवेक वॉकर यांनी त्यानंतर सदर फ्लॅट श्री. पिल्लई मुकेश कल्याणारायमन यांना दिनांक २७/११/२००१ रोजीच्या विक्री करारनाम्याद्वारे विकला. आणि ज्याअर्थी, श्री. पिल्लई मुकेश कल्याणारायमन यांनी त्यानंतर सदर फ्लॅट सौ. नीता मुकेश पटेल यांना दिनांक १६/०४/२००८ रोजीच्या विक्री करारनाम्याद्वारे, दस्त क्र. VSI–3/4342/2008 अंतर्गत विकला

ज्याअर्थी, असे कळविण्यात आले आहे की, उपरोक्त दिनांक ०९/०५/१९९४ रोजीचा विक्री करारनामा (Agreement for Sale) तसेच दिनांक २७/११/२००१ रोजीचा विक्री करारनामा (Agreement for Sale) है हरवले / गहाळ झाले असून, योग्य ती काळजीपूर्वक शोध व तपासणी करुनही ती अद्याप सापडलेली नाहीत. यासंदर्भात दिनांक २३/०७/२०२२ रोजी पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे.

म्हणून मी याद्वारे, सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद कागदपत्रे / सदर मालमत्ता याबाबत कोणत्याही व्यक्तीचा कब्जा, दावा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध अथवा कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी माझे कार्यालय क्र. एफ ०१ऐ– ३०, पहिला मजला, हावरे संेच्युरियन मॉल, सेक्टर १९ऐ, नेरुळ (पू), नवी मुंबई ४००७०६ येथे सदर नोटिशीस आजपासून ७ (सात) दिवसांच्या आत कोणतीही हरकत न आल्यास सदरच्या मालमत्तेवर / दस्तावर कोणताही दावा नाही असे गृहीत धरले जाईल

दिनांक : ०८.१०.२०२६

हरेश बी डेमला
(वकील उच्च न्यायालय, मुंबई)

सार्वजनिक सूचना

सर्वसामान्य जनतेस याद्वारे कळविण्यात येते की कै. श्री. वसंत बी. मन्सुखानी आणि श्री. अबिनाश बी. मन्सुखानी हे फ्लॅट क्र. 9, बिल्डिंग क्र. 13, दुसरा मजला, चेंबूर नवजीवन को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, 34, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई – 400 074 या सदनिकेचे संयुक्त मालक असून, सदर सदनिकेमध्ये त्यांचा 100% हिस्सा व हक्क होता.

सदर सोसायटीचे शेअर सर्टिफिकेट क्र. 916, दिनांक 01.05.1962 अंतर्गत प्रत्येकी रु. 50/– किंमतीचे जुने 5 शेअर्स, ज्यांचे विशिष्ट क्रमांक 3876 ते 3880 आहेत, तसेच नवीन शेअर सर्टिफिकेट क्र. 197, दिनांक 21.04.2018 अंतर्गत प्रत्येकी रु. 50/– किंमतीचे 10 (दहा) पूर्णतः भरलेले नवीन शेअर्स, ज्यांचे विशिष्ट क्रमांक 1971 ते 1980 आहेत, त्यांच्याकडे होते.

संयुक्त मालकांपैकी एक कै. श्री. वसंत बी. मन्सुखानी – अविवाहित यांचे दिनांक 19.06.2026 रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची विवाहित बहीण श्रीमती वीणा सी. सितलानी (पूर्वाश्रमीचे नाव : राजिनी बी. मन्सुखानी) तसेच त्यांचे अविवाहित बंधू श्री. अबिनाश बी. मन्सुखानी हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार व हयात वारसदार असून, यांच्याव्यतिरिक्त कै. श्री. वसंत बी. मन्सुखानी यांचे अन्य कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत.

आता सदर कायदेशीर वारसदारांपैकी श्री. अबिनाश बी. मन्सुखानी हे, कै. श्री. वसंत बी. मन्सुखानी यांच्या 50% हिस्स्यापैकी 25% हिस्सा व त्यासंबंधीचे हक्क, त्यांची बहीण श्रीमती वीणा सी. सितलानी (पूर्वाश्रमीचे नाव : राजिनी बी. मन्सुखानी) यांच्या नावे सोडून देत आहेत.

माझ्या अशीलाकडील सदर सदनिकेसंबंधीचे मूळ शेअर सर्टिफिकेट हरवलेले/गहाळ झालेले असून, वारंवार शोध घेऊन व सदर प्रमाणपत्र शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करूनही ते सापडलेले नाही. त्यामुळे माझ्या अशीलाने सदर सोसायटीकडे डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी अर्ज केला आहे.

सदर सदनिकेवर कोणतेही कर्ज, धारणाधिकार, जप्ती, गहाण, तारण, हायपोथिकेशन किंवा इतर कोणतेही भार/बोजा नाहीत. सदर सदनिका अशा सर्व प्रकारच्या कर्ज, धारणाधिकार, गहाण, तारण व इतर बोजांपासून पूर्णपणे मुक्त आहे.

सदर शेअर्स व सदनिकेबाबत विक्री, अदलाबदल, गहाण, भार/चार्ज, भेट, ताबा, भाडेकरार, लीज, वारसा, लायसन्स, धारणाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही दावा, हक्क, स्वारस्य किंवा आक्षेप असल्यास, अशा सर्व व्यक्तींनी सदर दावा/हक्क याबाबत खाली सही करणाऱ्या व्यक्तीस आणि/किंवा माझ्या अशीलास आणि/किंवा सदर सोसायटीस, म्हणजेच चेंबूर नवजीवन को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई – 400 074, यांना या जाहीर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून 14 (चौदा) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कळवावे.

अन्यथा, सदर मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अस्तित्वात नसलेले, माफ केलेले व सोडून दिलेले आहेत असे सर्व हेतू व उद्देशांसाठी गृहीत धरले जाईल आणि त्यानंतर माझ्या अशीलास सदर सदनिका तसेच शेअर सर्टिफिकेट सोसायटीच्या नोंदी व रजिस्टरमध्ये तिच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचा पूर्ण अधिकार राहील

मुंबई,
दिनांक : 08/10/2026.

टी/१०८/७, इनलॅक्स हॉस्पिटल रोड, जय शंकर मंदिर समोर, चेंबूर कॉलनी, चेंबूर, मुंबई–४०० ०७४.

सही/–
ॲड. मोहिनी टी. कुंदनानी
476/MAH81985

JAGSONPAL SERVICES LIMITED

जगसोनपाल सर्व्हिसेस लिमिटेड

(पूर्वीची जगसोनपाल फायनान्स अँन्ड लीजिंग लिमिटेड म्हणून ज्ञात)

सीआयएन : L62010MH1991PLC467067
नोंदणीकृत कार्यालय : २, बी विंग, ४ था मजला, कनेक्ट, सिल्व्हर युटोपिया, चकाला, अंधेरी (पूर्व), एअरपोर्ट (मुंबई), मुंबई – ४०० ०९९, महाराष्ट्र, भारत.
ई–मेल : info@jagsonpal.co.in **। दूरध्वनी क्र. :** ०२२–४०९९६४८४ **। वेबसाइट :** www.jagsonpal.co.in

पोस्टल बॅलटबाबत सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८, कलम ११० आणि इतर सर्व लागू तरतुदी; कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० आणि २२ (त्यातील कोणत्याही वैधानिक सुधारणेसह किंवा पुनर्रचनेसह, जे त्या वेळी अंमलात असेल); इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया ने जारी केलेले सर्वसाधारण सभांबाबतचे सेक्रेटरियल स्टँडर्ड ; सीक्युरिटीज अँन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमन, २०१५ आणि इतर लागू परिपत्रके, कायदे व नियम (सर्व सुधारित); तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए'') जारी केलेली सामान्य परिपत्रके (क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२० आणि त्यानंतरची संबंधित परिपत्रके व २२ सप्टेंबर २०२५ रोजीचे नवीनतम परिपत्रक – ज्यांना एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हटले आहे) आणि सेबी ची परिपत्रके यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून; जगसनपाल सर्व्हिसेस लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांकडून केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे (''रिमोट ई–व्होटिंग'') पोस्टल बॅलटद्वारे दि. ०७.१०.२०२६ रोजीच्या पोस्टल बॅलट सूचनेमध्ये नमूद केलेला ठराव मंजूर करण्याचा प्रस्ताव आहे.

कंपनीने दि. ०७.१०.२०२६ रोजी अशा सदस्यांना केवळ ईमेलद्वारे पोस्टल बॅलटची सूचना पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे, ज्यांची नावे **गुरुवार, दि. ०१.१०.२०२६ (''कट–ऑफ तारीख'')** रोजी सदस्यांच्या नोंदवहीत किंवा बेनिफि शियल ओनर्स च्या यादीत समाविष्ट आहेत आणि ज्यांचे ईमेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/कंपनी/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटकडे नोंदणीकृत आहेत.

एमसीए परिपत्रकांमधील आवश्यकतांनुसार, कंपनीने पोस्टल बॅलटची सूचना केवळ ईमेलद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवली आहे. त्यानुसार, या पोस्टल बॅलटसाठी सदस्यांना सूचनेची कागदोपत्री, पोस्टल बॅलट फ ॉर्म आणि प्री–पेड बिझनेस रिप्लाय एन्व्हलप पाठवले जाणार नाही. ही सूचना कंपनीच्या www.jagsonpal.co.in या संकेतस्थळावर, बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या संकेतस्थळावर आणि एनएसडीएलच्या https://www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सीक्युरिटीज अँन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिसक्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ चे पालन करून आणि कंपनी कायदा, २०१३ ची कलमे ११० व १०८, त्याअंतर्गत केलेले नियम व एमसीएची परिपत्रके यांच्या तरतुदींनुसार, कंपनी आपल्या सदस्यांना केवळ रिमोट ई–व्होटिंग सुविधा उपलब्ध करून देत आहे. यामुळे सदस्यांना पोस्टल बॅलेट फ ॉर्म प्रत्यक्ष सादर करण्याऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करणे शक्य होईल. सदस्यांना रिमोट ई–व्होटिंग सुविधा पुरवण्यासाठी कंपनीने नॅशनल सीक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') च्या सेवा घेतल्या आहेत.

रिमोट ई–व्होटिंगचा कालावधी **गुरुवार, दि. ०८.१०.२०२६ रोजी स. ९.०० वा. (भा. प्र. वे.)** सुरू होईल आणि **शुक्रवार, दि. ०६.११.२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भा. प्र. वे.)** संपेल. ज्या सदस्यांना रिमोट ई–व्होटिंग प्रक्रियेद्वारे मतदान करायचे आहे, त्यांना विनंती आहे की त्यांनी **शुक्रवार, दि. ०६.११.२०२६** रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (भा. प्र. वे.) आपली संमती वा असहमती नोंदवावी. त्यानंतर लगेचच रिमोट ई–व्होटिंग सुविधा बंद केली जाईल आणि नमूद केलेल्या तारखे व वेळेनंतर ई–व्होटिंगची परवानगी दिली जाणार नाही. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यास पात्र ठरण्यासाठी कंपनीच्या सदस्यांसाठी कट–ऑफ तारीख ०१.१०.२०२६ ही आहे. कट–ऑफ तारखेला जे व्यक्ती सदस्य नाहीत, त्यांनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.

कोणत्याही शंका असल्यास, भागधारक एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरील डाउनलोड विभागात उपलब्ध असलेली सातत्याने विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) व ई–व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकतात; किंवा ०२२–४८८६ ७००० आणि ०२२–२४९९ ७००० या टोल–फ्री क्रमांकांवर संपर्क साधू शकतात किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवू शकतात. याव्यतिरिक्त, सदस्य रजिस्ट्रार्स अँड ट्रान्सफ र एजंट – मास सर्व्हिसेस लिमिटेडशी info@maaserv.com येथे किंवा कंपनीला compliance@jagsonpal.co.in येथे संपर्क साधू शकतात.

पोस्टल बॅलट प्रक्रिया पार पाडण्यासाठी आणि रिमोट ई–व्होटिंग प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शकपणे तपासण्यासाठी पूजा सावरकर अँड असोसिएट्स – कार्यरत कंपनी सचिव यांची परीनिरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रस्तावित ठराव आवश्यक बहुमताने मंजूर झाल्यास, तो रिमोट ई–व्होटिंग च्या अंतिम तारखेला, म्हणजेच शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी मंजूर झाल्याचे मानले जाईल. पोस्टल बॅलट द्वारे घेण्यात आलेल्या मतदानाचे निकाल आणि परीनिरीक्षकांचा अहवाल कंपनीच्या www.jagsonpal.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाईल; तसेच बीएसई लिमिटेड ला कळविला जाईल आणि ई–व्होटिंग प्रक्रिया संपल्यानंतर ४८ तासांच्या आत www.bseindia.com वर उपलब्ध केला जाईल.

ज्या सदस्यांनी नोटीस, वार्षिक अहवाल आणि तत्सम पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्राप्त करण्यासाठी त्यांचे ई–मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/कंपनी/रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजंट यांच्याकडे अद्याप नोंदवलेले नाहीत, त्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे ई–मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक रजिस्ट्रार्स अँड ट्रान्सफर एजंट्स किंवा संबंधित मडिपॉझिटरी पार्टिसिपंट्सफ किंवा कंपनीकडे (वर नमूद केलेल्या ई–मेल आयडींवर) पाठवावेत.

जगसोनपाल सर्व्हिसेस लिमिटेड करिता
सही/–
कार्तिक श्रीनिवासन
अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य वित्त अधिकारी
डीआयएन : ०९८०५४८५

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०८.१०.२०२६

जाहीर नोटीस

ह्या जाहीर नोटीस ने सर्व लोकांना कळविण्यात येते की **१) श्री अनिलकुमार दिनानाथ तिवारी, २) श्रीमती गीता अनिल तिवारी, ३) श्री सुमितकुमार अनिल तिवारी** आणि **४) श्री विकाश अनिल कुमार तिवारी** आणि श्री अनिलकुमार दिनानाथ तिवारी यांच्या संयुक्त मालकीचे फ्लॅट क्र.३०३, ३रा मजला, सी–विंग, गोदरेज ट्रांक्विल बिल्डींग, शिवम ट्रांक्विल को. ऑप. हौ. सो. ली., ऑफ आकुर्ली क्रॉस रोड, लोखंडवाला टाऊनशिप, कांदिवली पुर्व, मुंबई–४००१०१ (यापुढे नमूद फ्लॅट म्हणून संदर्भित केल जाईल). दिनांक ०६/०५/२०२६ रोजी श्रीमती गीता अनिल तिवारी यांचे निधन झाले त्यांचे कायदेशीर वारस १) श्री अनिलकुमार दिनानाथ तिवारी (नवरा), २) श्री सुमितकुमार अनिल तिवारी (मुलगा) ३) श्री विकाश अनिल कुमार तिवारी (मुलगा) आणि ४) श्रीमती वंदना आकाश पांडेय (मुलगी) हे आहेत. आत्ता १) श्री सुमितकुमार अनिल तिवारी (मुलगा) २) श्री विकाश अनिल कुमार तिवारी (मुलगा) आणि ३) श्रीमती वंदना आकाश पांडेय (मुलगी) हे त्यांचे नमूद फ्लॅट चे वारसा हक्क व अधिकार त्यांचे वडील श्री अनिलकुमार दिनानाथ तिवारी ला देत आहेत. तर कोणाचाही दावा किंवा आक्षेप असल्यास त्यांनी तो प्रकाशन तारखेपासून १५ दिवसांच्या आत वकील श्री प्रभात गुप्ता ह्यांचाशी खालील दिलेल्या पत्त्या वरती संपर्क करा.

एसडी/–
ॲड. श्री प्रभात गुप्ता
(बी.ए.एल.एल.बी.)
फ्लैट नंबर जी–९/ए, न्यू महावीर स्मृति, क्रॉस रोड नंबर ३ (उत्तर), नवघर रोड, भयंदर (ई), जिला ठाणे ४०११०५.
तारीख: ०८.१०.२०२६

सुमित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

Altius

सीआयएन : U64200MH2013PLC375466
नोंदणीकृत कार्यालय : युनिट – २, ९ वा मजला, टॉवर ४, इक्वीनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस मार्ग, कुर्ला (प.), मुंबई – ४०० ०७०. **दूर. क्र. :** ०२२ – ६९०७५२५२
ई–मेल : summitcompliance@altusinfra.com **वेबसाइट :** www.altiusinfra.com

डिबेंचरधारकांना सूचना - व्याज व रिडेम्पशन प्रदानासाठी नोंद दिनांक
संदर्भ : आयएसआयएन : आयएनई५०७टी०७११२

याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, कंपनीद्वारे खाजगी विनियोग तत्त्वावर जारी व वाटप केलेल्या, ५२५ कोटी रुपये (''एनसीडीज'') एकूण मूल्याच्या, १०० ००० रेटेड, सूचीबद्ध, करपात्र, संरक्षित व रिडीमेबल नॉन कन्व्हर्टीबल डिबेंचर्सच्या अटी व शर्तीनुसार जे नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाच्या डेब्ट मार्केट विभागात सूचिबद्ध आहेत त्यांकरिता कंपनीने **शुक्रवार, दि. १६.१०.२०२६** हा दिवस नियत दिनांकास अन्यथा **शनिवार, दि. ३१.१०.२०२६** नुसार व्याज व रिडेम्पशन रक्कम यांच्या प्रदानाच्या प्राप्तीकरिता एनसीडी धारक पात्र नावे निश्चित करण्याकरिता नोंद केला आहे. ज्या एनसीडी धारकांचे नाव जारीकर्ता व शेअर ट्रान्सफर एजंट/डिपॉझिटरीज यांच्याकडे रजिस्ट्रारद्वारे सादर केलेल्या सूचीनुसार नोंद दिनांकास लाभार्थी मालक म्हणून दिसून येतील ते सदर प्रदानास पात्र असतील.

सुमित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/–
मयंक पटवा
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी
एसीएस : ४२४८०

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०७.१०.२०२६

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **कै. श्रीमती अनुसूया श्रीकृष्ण ठाकूर** आणि **श्रीमती रेखा एस. ठाकूर** या संयुक्त मालक असून, त्यांना खालील नमूद केलेल्या मिळकतीवर हक्क व मालकी हक्क प्राप्त होते. फ्लॅट क्र.७१२, ७वा मजला, क्षेत्रफळ ५२३ चौ. फूट कार्पेट एरिया, सी इमारतीमधील पाम्स–२ अपार्टमेंट, पाम्स २ सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड या गृहनिर्माण संस्थेतील, आरे मिल कॉलनी, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०००६५, ही इमारत सर्व्हे नं.१६९ (पार्ट), सी.टी.एस. नं.१६२७ (पार्ट), मौजे मारोशी, तालुका बोरीवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील जमिनीवर बांधण्यात आलेली आहे. सदर मिळकतीसोबत सदर संस्थेचे रु.५०/– प्रत्येकी किंमतीचे पाच पूर्णतः भरलेले समभाग, ज्यांचे विशिष्ट क्रमांक ७७६ ते ७८० (दोन्ही क्रमांकांसहित) असून, सदर संस्थेने दिनांक ३०.१२.२००९ रोजी जारी केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र.१६४ मध्ये त्यांचा समावेश आहे. सदर मिळकतीस यापुढे सदर मिळकत असे संबोधण्यात येईल.

ज्याअर्थी, कै. श्रीमती अनुसूया श्रीकृष्ण ठाकूर यांचे दिनांक २१/११/२०१६ रोजी मृत्युपत्र न करता निधन झाले आणि त्यांच्या पतीचे दिनांक ०४/११/१९८१ रोजी निधन झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांची मुलगी श्रीमती रेखा एस. ठाकूर या एकमेव कायदेशीर वारसदार आहेत, ज्या 'सदर मिळकतीच्या एकमेव व पूर्ण मालक झाल्या.

आता **श्रीमती रेखा एस. ठाकूर** सदर मिळकत **श्री. रवी कुमार सिंग** आणि **सौ. रुची चतुर्वेदी** यांना विकू इच्छितात.

म्हणून, सदर मिळकतीबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागावर वारसा, विक्री, गहाण, देणगी, धारणाधिकार, विश्वस्त, परवाना, अधिकार किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, असा दावा कागदोपत्री पुराव्यासह, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर अधोस्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीकडे सादर करणे आवश्यक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, असा कोणताही दावा, जर असेल तर, सोडून दिलेला मानला जाईल आणि तो आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक: ०८.१०.२०२६ **सही/–**
ॲड. रितीका एम. झंगीयानी
४२२/२, न्यु सोनल लिंक इंड. इस्टेट, लिंक रोड, मालाड (प.), मुंबई–६४.

Chola Enter a better life

चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : "चोला क्रेस्ट", सी-54 व 55, सुपर बी-4, थिरू व्ही. का. इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई – 600032. शाखा कार्यालय: चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लि., युनिट क्र. 203, लोटस आयटी पार्क, रोड नं. 16, वागले इस्टेट, ठाणे (पश्चिम), महाराष्ट्र – 400604 संपर्क क्रमांक: श्री तेजस मेहता, मोबाईल: 9825356047 श्री मुहम्मद रहीस, मोबाईल: 8124000030 / 6374845616 श्री रावसाहेब अनुसे, मोबाईल: 9834119898

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 9(1) च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तांचा पुढे चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड असा उल्लेख करण्यात येणाऱ्या मे. चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे. सदर सुरक्षित मालमत्ता **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे"** तत्त्वावर ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. याद्वारे सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येते की आम्ही सदर जाहीर लिलाव **https://chola-lap.procure247.com** या वेबसाईटच्या माध्यमातून करणार आहोत.

ई-लिलाव दिनांक व वेळ	ईएमडी जमा करण्याची अंतिम तारीख	तपासणी दिनांक
28/10/2026 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत (प्रत्येक वेळी 3 मिनिटांची अमर्याद वाढ लागू राहील).	27/10/2026 (सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत)	15/10/2026

अनु क्र.	खाते क्र. तसेच कर्जदार, सह-कर्जदार व गहाणदार यांची नावे	कलम 13(2) अंतर्गत मागणी नोटीसनुसार दिनांक व रक्कम	राखीव किंमत, अनामत रक्कम आणि बोली वाढीची रक्कम (रुपयांमध्ये)	सूचना कालावधी / ताब्याचा प्रकार
1.	<u>कर्ज खाते क्रमांक : HE01MAI00000020610</u> नवल सुभाष दळवी (अर्जदार) अभिलाषा नवल दळवी (सह-अर्जदार)दोघांचाही पत्ता : 44/3/302, ओम ओंकार सीएचएस, प्रकृती हॉस्पिटलसमोर, मनीषा नगर गेट क्र. 1, मुंबई–पुणे रोड, कळवा (पश्चिम), ठाणे – 400605.	11/04/2025 रु. 27,25,933/- 11/04/2025 रोजी	रु. 25,00,000/- रु. 2,50,000/- रु. 25,000/-	15 दिवस / प्रत्यक्ष ताबा

अचल मालमत्तेचे वर्णन:- फ्लॅट क्र. 302, तिसऱ्या मजल्यावर, क्षेत्रफळ 630 चौ. फूट (बांधकाम क्षेत्र), इमारत क्र. 44 मध्ये, "मनीषा नगर" म्हणून ओळखली जाते आणि "ओम ओंकार सीएचएसएल" नावाची सोसायटी, सर्व्हे क्रमांक 5 आणि 4, हिस्सा क्र. 1, 2, 6, सर्व्हे क्र. 5, हिस्सा क्र. 1, 2, 7, 8, 10, सर्व्हे क्र. 10, हिस्सा क्र. 1, 3, 5, सर्व्हे क्र. 20 (भाग), सर्व्हे क्र. 21 (भाग), सर्व्हे क्र. 22 (भाग), सर्व्हे क्र. 23, हिस्सा क्र. 1, 2 (भाग) असलेल्या जमिनीवर बांधलेली आहे, मनीषा नगर, गाव - कळवा, तालुका व जिल्हा - ठाणे येथे स्थित.

सीआयएफसीएलला ज्ञात असलेले भार/दायित्वे: ज्ञात नाही

1. सर्व इच्छुक सहभागी / बोलीदारांनी **https://chola-lap.procure247.com आणि www.cholamandalam.com/news/auction-notices** या संकेतस्थळांना भेट द्यावी. अधिक तपशील व सहाय्यासाठी इच्छुक बोलीदारांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा — **श्री. मुहम्मद रहीस – मो. नं. 8124000030 / 6374845616, ई-मेल आयडी : CholaAuctionLAP@chola.murugappa.com. फक्त ई-लिलाव प्रशिक्षणासाठी M/s. Procure247 श्री. वासू पटेल मोबाईल नं. 9510974587. यांच्याशी संपर्क साधावा.**
2. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी कृपया **https://chola-lap.procure247.com आणि www.cholamandalam.com/news/auction-notices** या संकेतस्थळांना भेट द्यावी.

ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 9(1) अंतर्गत देण्यात येणारी वैधानिक 15 दिवसांची विक्री सूचना

दिनांक: 08/10/2026, स्थळ : गाव- कळवा, ता. व जिल्हा - ठाणे (प्राधिकृत अधिकारी), चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

शाह कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ११, शाह इंडस्ट्रियल इस्टेट, अण्णा मंदिरा समोर, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०००५३.
दूरध्वनी: ०२२-६६९२०६७८/७९ **ई-मेल:** scclindia@yahoo.co.in | **CIN: L45202MH1949PLC007048**

७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, ई-मतदानाची माहिती व सभासद नोंदवही बंद ठेवण्याबाबत सूचना

१. याद्वारे सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की, शाह कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड च्या सभासदांची ७८वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता (भावेप्र), दूरचित्र परिषद ("व्हीसी") / अन्य दृक्-श्राव्य माध्यमे ("ओएव्हीएम") यांद्वारे आयोजित करण्यात येणार आहे. सदर सभेत सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
सदर सभा कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २०/२०२० दिनांक ५ मे २०२० तसेच त्यानंतर जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांनुसार, ज्यामध्ये नवीनतम सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२, सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३ आणि सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ यांचा समावेश आहे (यापुढे एकत्रितपणे "एमसीए परिपत्रके" असा उल्लेख करण्यात येईल), तसेच भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने जारी केलेल्या परिपत्रक क्रमांक SEBI/HO/CFD/CMD1/ CIR/P/2020/79, SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2021/11, SEBI/HO/CFD/CMD2/CIR/P/2022/62 आणि SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4, अनुक्रमे दिनांक १२ मे २०२०, १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२ आणि ५ जानेवारी २०२३ नुसार (यापुढे एकत्रितपणे "सेबी परिपत्रके" असा उल्लेख करण्यात येईल) आयोजित करण्यात येत आहे.

२. वरील परिपत्रकांचे अनुपालन म्हणून, ७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना तसेच आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल पाहण्यासाठीची वेबलिंक असलेली इलेक्ट्रॉनिक प्रत, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे/ठेवीदारांकडे नोंदणीकृत आहेत अशा सभासदांना दिनांक ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्यात आली आहे.
७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर www.shah-construction.in येथे उपलब्ध आहे. तसेच तो बीएसई लिमिटेड या मान्यताप्राप्त शेअर बाजाराच्या संकेतस्थळावर www.bseindia.com येथेही उपलब्ध आहे.

३. ज्या सभासदांनी अद्याप आपला ई-मेल पत्ता नोंदविलेला नाही, त्यांनी समभाग अभौतिक स्वरूपात धारण केले असल्यास संबंधित ठेवीदार सहभागी (डीपी) यांच्याकडे आणि समभाग भौतिक स्वरूपात धारण केले असल्यास पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे support@purvashare.com या ई-मेलद्वारे आपला ई-मेल पत्ता नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे.

४. कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम १०८, कंपनीज (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० तसेच वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धतेच्या जबाबदाऱ्या व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ मधील विनियम ४४ नुसार, कंपनी आपल्या त्या सभासदांना, ज्यांच्याकडे भौतिक किंवा अभौतिक स्वरूपात समभाग आहेत, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्या ई-मतदान प्रणालीद्वारे https://evoting.purvashare.com येथे उपलब्ध करून देत आहे.
वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कंपनीने पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी करार केला आहे. दूरस्थ ई-मतदानाची सुविधा https://evoting.purvashare.com येथे उपलब्ध असेल.

५. सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की :
(अ) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाद्वारे पार पाडता येईल.
(ब) दूरस्थ ई-मतदानाची सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेल :

दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख व वेळ :	मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भावेप्र)
दूरस्थ ई-मतदान समाप्त होण्याची तारीख व वेळ :	गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भावेप्र)

त्यानंतर ई-मतदान प्रणाली मतदानासाठी बंद करण्यात येईल. एखाद्या ठरावावर सभासदाने एकदा मतदान केल्यानंतर त्यास त्यामध्ये नंतर कोणताही बदल करता येणार नाही. गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर दूरस्थ ई-मतदानाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.
(क) शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ या निर्णायक दिनांकास कंपनीचे समभाग धारण करणारे सभासद ७८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात येणाऱ्या सर्व कामकाजासंदर्भात ई-मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
(ड) दूरचित्र परिषद/अन्य दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होणारे आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही, असे सभासद सभेदरम्यान ई-मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
(इ) सभेची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे समभाग संपादित करून कंपनीचे सभासद झालेले आणि शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ या निर्णायक दिनांकास समभाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती आपला प्रवेश ओळख क्रमांक व संकेतशब्द प्राप्त करण्यासाठी evoting@purvashare.com येथे विनंती पाठवू शकते. सदर विनंतीमध्ये फोलिओ क्र., डीपी आयडी आणि क्लाईंट आयडी क्र. नमूद करणे आवश्यक आहे.
तथापि, संबंधित सभासद दूरस्थ ई-मतदानासाठी यापूर्वीच नोंदणीकृत असल्यास, मतदान करण्यासाठी तो/ती विद्यमान वापरकर्ता ओळख क्रमांक व संकेतशब्द वापरू शकतो/शकते. ज्या सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केले आहे, ते दूरचित्र परिषद/अन्य दृक्-श्राव्य माध्यमांद्वारे सभेत उपस्थित राहू किंवा सहभागी होऊ शकतात; तथापि, त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.
(फ) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित कोणतीही तक्रार असल्यास सुश्री दीपाली धुरी, अनुपालन अधिकारी, पूर्वाशेरेजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, युनिट क्रमांक १, शिवशक्ती औद्योगिक वसाहत, जे.आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०० ०११ यांच्याशी संपर्क साधावा किंवा evoting@purvashare.com या ई-मेलवर कळवावे. तसेच ०२२-४९६१४१३२ आणि ०२२-३५२२००५६ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधता येईल किंवा कंपनीशी scclindia@yahoo.co.in या ई-मेलद्वारे संपर्क साधता येईल.

६. कंपनीने मेसर्स डी. कोठारी अँड असोसिएट्स, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज यांच्या सौ. धनराज कोठारी यांची ई-मतदान प्रक्रिया निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने तपासण्यासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

७. पुढे असेही सूचित करण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ९१ आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धतेच्या जबाबदाऱ्या व प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ मधील विनियम ४२ नुसार, कंपनीची सभासद नोंदवही आणि समभाग हस्तांतरण नोंदवही शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ ते शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत (दोन्ही दिवसांसह) बंद ठेवण्यात येतील.

८. भौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे सभासद फॉर्म ISR-1 मध्ये आवश्यक माहिती भरून व स्वाक्षरी करून, आधारशी संलग्न पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत तसेच फॉर्म ISR-1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सभासदाच्या पत्त्याच्या पुराव्याची स्वयं-साक्षांकित प्रत यासह support@purvashare.com या ई-मेलवर पाठवून आपला ई-मेल पत्ता नोंदवू किंवा अद्ययावत करू शकतात. त्यानंतर त्याची भौतिक प्रत टपालाद्वारे नोंदणी व समभाग हस्तांतरण प्रतिनिधी (आरटीए) यांच्याकडे किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावी.वरील तपशील अद्ययावत करण्यासाठी आवश्यक फॉर्म कंपनीच्या संकेतस्थळावर www.shah-construction.in/ येथेही उपलब्ध आहेत. अभौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे सभासद आपला ई-मेल पत्ता त्यांच्या संबंधित ठेवीदार सहभागी (डीपी) यांच्याकडे अद्ययावत करू शकतात.

९. भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या मास्टर परिपत्रकानुसार तसेच निबंधक व समभाग हस्तांतरण प्रतिनिधी (आरटीए) यांच्यासाठी भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने दिनांक ४ जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांनुसार (FAQs), संबंधित सभासदांना आरटीए कडे तक्रार नोंदविण्याचा किंवा कोणतीही सेवा विनंती सादर करण्याचा अधिकार त्यांचे KYC पूर्ण झाल्यानंतरच उपलब्ध होईल.वरील माहिती कंपनीच्या सर्व सभासदांच्या माहिती व हितासाठी तसेच लागू कायदा, एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रके यांच्या अनुपालनार्थ जारी करण्यात येत आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
शाह कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड करिता
सही/-
मेहुल जे. शाह
संचालक

दिनांक : ०८ ऑक्टोबर २०२६
स्थळ : मुंबई